संं.फौ.ख.क्र. २२५/२०१२
नितीन वि. अजिनाथ
निशाणी क्र. १०७

## आरोपीतर्फे साक्षीदार क्र.०१ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– सागर विलास पाटील
**वय** :– ३५ वर्षे, **धंदा** :– नोकरी
**राहणार** :– आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

## शपथेवर सरतपासणी आरोपीतर्फे – विद्यमान वकील श्री. एस.एस. शेठ, यांच्यामार्फत

**१.** सन २०१२ पासून मी मनमंदीर का.ऑप.बँक, शाखा आटपाडी येथे काम करीत आहे. मी सद्या ऑफिसर म्हणून आटपाडी शाखेत कार्यरत आहे. बँकेला न्यायालयाचे साक्षी समन्स प्राप्त झाले आहे. साक्षी समन्स मध्ये नमुद केल्याप्रमाणे मी बँकेतील मुळ कागदपत्रे सोबत आणली आहेत.

**२.** मी आज माझ्यासोबत खाते क्र. सी.ए.–२४० चा खाते उघडण्याचा मुळ अर्ज (फॉर्म) घेवून आलो आहे.सदर खाते दि. ३१/१२/२००८ रोजी मनमंदीर को.ऑप. बँक विटा, शाखा आटपाडी येथे उघडले आहे. सदर खाते वैभव कृषी सेवा केंद्र, प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांच्या नावे उघडले आहे. सदर अर्जावर अर्जदार म्हणून प्रोप्रा. अजिनाथ गाडवे यांची सही आहे. सदर फॉर्मवर खालच्या बाजुला सहीच्या रकान्यामध्ये प्रोप्रा. अजिनाथ गाडवे यांची सही आहे आणि वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगली असा शिक्का असून त्यावर अजिनाथ गाडवे यांची सही आहे. मनमंदीर को.ऑप.बँक विटा, शाखा–आटपाडीचे तत्कालीन प्रंबधक यांनी सहीची पडताळी केली व खाते उघडले म्हणून त्यांची सही केली आणि बँकेचा गोल शिक्का लावला. सदर खाते उघडण्याच्या अर्जावर वरच्या बाजूला के.वाय.सी. झाल्याचा शिक्का आहे.

**३.** सदर अर्जासोबत के.वाय.सी. चा वेगळा अर्ज आहे. सदर अर्जावर

के.वाय.सी. वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगली प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांनी सही व शिक्का केला आहे. खाते उघडण्याचा मुळ अर्ज व के.वाय.सी. चा मुळ अर्ज हे मला बँकेमधून मुळ उपलब्ध झाले आहे. सदर खाते उघडण्याच्य अर्जाला **निशाणी १०८** देण्यात येते व के.वा.सी. फॉर्मला **निशाणी १०९** देण्यात येते.

**४.** खाते उघडताना प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांनी त्यांचा व्यवसाय सुरु असलयासंदर्भात व्यवसाय चालु असल्याचा दाखल्याची मुळ प्रत जोडली होती. सदर दाखल्यावर वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची तर्फे प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांनी शिक्का लावून त्यांची सही केली आहे. सदर दाखला ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, दिघंची यांनी दिला होता. सदर उता–यावर ग्रामविकास अधिकारी यांची सही व ग्रामपंचायतचा शिक्का आहे. त्यास **निशाणी ११०** देण्यात येते.

**५.** खाते उघडताना प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांनी रहिवासी दाखला सोबत जोडला होता. सदर दाखला गावकामगार तलाठी, दिघंची यांनी दिलेला आहे. सदर दाखलयावर गावकामगार तलाठी, दिघंची यांची सही व शिक्का आहे. सदर दाखल्यावर वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची तर्फे प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांनी शिक्का लावून त्यांची सही केली आहे. सदर रहिवासी दाखल्यास **निशाणी १११** देण्यात येते.

**६.** खाते उघडताना प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांनी खत परवाना नविन नुतनिकरणाचा दाखला सोबत जोडला होता. सदर दाखला कृषी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांनी वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची तर्फे प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांना दिला होता. के.वाय.सी. करताना वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची तर्फ प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांची सही व शिक्का घेतला होता. सदर नुतणीकरणाचा कागद हा छायांकीत प्रत असल्याने त्यास निशाणी देता येणार नाही असा आक्षेप फिर्यादीच्या वकीलांनी घेतला. यावर आरोपीतर्फे असायुक्तीवाद करण्यात आला

की, सदर नुतणीकरण दस्ताचे के.वाय.सी. करताना बॅकेने आरोपीची सही व शिक्का घेतला आहे. त्यावर त्यास निशाण देता येईल. वास्तविक पाहता, सदर दस्त हा बॅंकेने छायांकीत प्रत हस्तगत केल्याने त्याची मुळ प्रत किंवा प्रमाणीत पटलावर नाही. के.वाय.सी. करीता आरोपीची सही व शिक्का त्यावर दिसून येतो. त्यामुळे सदर दस्तास के.वाय.सी. पुरते **निशाणी ११२** देण्यात येते, इतर मजकूराबाबत नाही.

७. खाते उघडताना अजिनाथ गाडवे यांनी परिशिष्ठ ब रासायनिक खत पुरवठा चा दाखल सोबत जोडला होता. सदर दाखला परवाना अधिकारी तथा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची तर्फे प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांना दिला होता. के.वाय.सी. करताना वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची तर्फे प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांची सही व शिक्का घेतला होता. सदर नुतणीकरणाचा कागद हा छायांकीत प्रत असल्याने त्यास निशाणी देता येणार नाही असा आक्षेप फिर्यादीच्या वकीलांनी घेतला. यावर आरोपीतर्फे असायुक्तीवाद करण्यात आला की, सदर परिशिष्ठ ब रासायनिक खत पुरवठा चा दाखला के.वाय.सी. करताना बॅकेने आरोपीची सही व शिक्का घेतला आहे. त्यावर त्यास निशाण देता येईल. वास्तविक पाहता, सदर दस्त हा बॅंकेने छायांकीत प्रत हस्तगत केल्याने त्याची मुळ प्रत किंवा प्रमाणीत पटलावर नाही. के.वाय.सी. करीता आरोपीची सही व शिक्का त्यावर दिसून येतो. त्यामुळे सदर दस्तास के.वाय.सी. पुरते **निशाणी ११३** देण्यात येते, इतर मजकूराबाबत नाही.

८. खाते उघडताना प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांच्याकडून फॉर्म ए–२ घेतला होता. सदर फॉर्म ए–२ हा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांनी वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची तर्फे प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांना दिला होता. के.वाय.सी. करताना वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची तर्फेप्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांची सही व शिक्का घेतला होता. सदर फॉर्म ए–२ कागद हा छायांकीत प्रत

असल्याने त्यास निशाणी देता येणार नाही असा आक्षेप फिर्यादीच्या वकीलांनी घेतला. यावर आरोपीतर्फे असायुक्तीवाद करण्यात आला की, सदर नुतणीकरण दस्ताचे के.वाय.सी. करताना बॅकेने आरोपीची सही व शिक्का घेतला आहे. त्यावर त्यास निशाण देता येईल. वास्तविक पाहता, सदर दस्त हा बॅँकेने छायांकीत प्रत हस्तगत केल्याने त्याची मुळ प्रत किंवा प्रमाणीत पटलावर नाही. के.वाय.सी. करीता आरोपीची सही व शिक्का त्यावर दिसून येतो. त्यामुळे सदर दस्तास के.वाय.सी. पुरते **निशाणी ११४** देण्यात येते, इतर मजकूराबाबत नाही.

९. सदरचे खाते चालू खाते होते. (करंट अकाउंट– सी.ए. २४०). सदर खात्याला धनादेशाची सुविधा देण्यात आली होती. सदरचे खाते करंट खाते आहे व त्या खात्याला धनादेशाची सुविधा असल्यासंदर्भातला मजकूर नमुद केलेला आहे. प्रोप्रा. अजिनाथ गाडवे यांना दहा पानी धनादेश पुस्तीका दिल्याबाबतचा उल्लेख अर्जावर केलेला आहे.

१०. खाते उघडले जाते त्यावेळी खातेदाराकडून त्याचे सहीचे नमुने घेतले जातात. मी साक्षीला येताना सहीचे नमुन्याचा मुळ फॉर्म/कार्ड सोबत आणले आहे. आता मला सदर मुळ काड दाखविण्यात आले. सदर कार्डवर खाते क्रमांक सी.ए–२४० असा नमुद केलेला आहे. सदर फॉर्मवर नाव आणि पत्ता म्हणून वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची तर्फे प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांचे नाव व पत्ता आहे. सदर कार्डवर अजिनाथ गाडवे यांनी त्यांची सही केली आहे ती सही वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची चे प्रोप्रायटर म्हणून शिक्का लावून केली आहे. सही नमुन्याच्या फॉर्मवर अर्जदाराचा फोटो बॅँक घेत असते. सदर फॉर्मवर प्रोप्रा. आजिनाथ गाडवे यांचा फोटो आहे. सदर सहीचा नमुना बॅँकेने ३१/१२/२००८ रोजी घेतला आहे. सदर फॉर्मवर शाखाधिकारी आणि तपासणी अधिकारी यांनी सही केली आहे. सदर कार्ड मी बॅकेच्या मुळ अभिलेखातून आणले आहे. सदर कार्डच्या पाठीमागे भव कृषी सेवा केंद्र, दिघंची चे प्रोप्रायटर म्हणून सही व शिक्का

घेतला आहे. सदर फॉर्मवर अजिनाथ गाडवे यांची सही इंग्रजी भाषेत केलेली दिसते. सर्व कागदपत्रांवर अजिनाथ गाडवे यांच्या इंग्रजी भाषेतील सहया असल्याचे दिसून येते. सदर स्पेसीमन कार्डला **निशाणी ११५** देण्यात येते.

**११.** आता मला निशाणी ३० वरील वादग्रस्त धनादेश दाखविण्यात आला. सदरी धनादेश मनमंदीर को.ऑप. बँक लि. विटा, शाखा–आटपाडी चा आहे. सदर धनादेश करंट अकाउंट २४० करीता दिलेला आहे. सदर खात्यावर अकाउंट नंबर म्हणून २४० नमुद आहे. सदर धनादेशाचा क्रमांक १२९२१७ असा आहे. सदर धनादेश चालु खात्याचा असल्याबाबत धनोदशावर बँकेचा शिक्का आहे. बँकेच्या अभिलेखाप्रमाणे चालु खाते नं. २४० हे वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची चे प्रोप्रायटर अजिनाथ गाडवे यांच्या नावाचे होते. वादग्रस्त धनादेश वैभव कृषी सेवा केंद्र, दिघंची चे प्रोप्रायटर अजिनाथ गाडवे यांच्या खात्यावरील आहे. सदर धनादेशावरील सही ही मराठी भाषेतील दिसत आहे. निशाणी १०८ व ११५ वरील सही वादग्रस्त धनादेश निशाणी ३० वर दिसून येत नाहीत.

**१२.** एखादा धनादेश आमच्या बँकेमध्ये वटण्याकरीता आल्यास त्या खातेदाराची बँकेने घेतलेल्या स्पेसीमन सिग्नेचर वरील सह्या आणि वटण्यासाठी आलेल्या धनादेशावरील सही ही आम्ही पडताळून पाहत असतो. एखादे धनोदशावरील सही स्पेसीमन सिग्नेचरप्रमाणे नसल्यास आमची बँक 'सिग्नेचर डिफर' या शे–यासह मेमो देत असते. आता मला निशाणी ३१ वरील बँक मेमो दाखविण्यात आला. सदर बँक मेमो आमच्या बँकेतील आटपाडी शाखेचा आहे. निशाणी ३१ चा मेमो धनादेश क्रमांक १२९२१७ करीता दिलेला आहे. हे खरे आहे की, आमच्या बँकेतील अधिका–यांनी ड्रॉवर फॉर सिग्नेचर डिफर यावर टिकमार्क केली नाही. आमच्या बँकेले निशाणी ३१ प्रमाणे फंड्स इनसफीशीएंट यावर टिकमार्क केले आहे. अभिलेखाप्रमाणे आमच्या बँकेचे तत्कालीन संबंधीत अधिकारी यांनी सहीच्या नमुन्याबरोबर धनादेशावरील सहीची पडताळी केली

नसल्याचे दिसून येते. वादग्रस्त धनादेशावरील सहीसारखी सही खाते उघडण्याचा फॉर्म अगर इतर कोणत्याही कागदपत्रांवर नाही. अभिलेखावरुन दिसून येते की, वादग्रस्त धनादेश बँकेचे तत्कालीन अधिकारी यांनी सहीची पडताळणी आमच्या अभिलेखाप्रमाणे न करता धनोदश न वटता परत पाठविला.

**उलटतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. आर. कदम यांच्यामार्फत सुरु –**

**१३.** माझी जन्मतारीख १२/०३/१९९० अशी आहे. माझे शिक्षण बी.कॉम पर्यंत झालेले आहे. मी सन २०१० साली बी.कॉम ची डिग्री घेतलेली आहे. मी मनमंदीर बँकेमध्ये २ मे, २०१२ रोजी रुजू झालो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या बँकेला न्यायालयाचे समन्स आल्यास किंवा एखाद्या कादपत्राची न्यायालयाने मागणी केल्यास आम्हाला आमच्या वरिष्ठ कार्यालयास त्याबाबत कळवावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने साक्षीला जाणे, कागदपत्रे न्यायालयात हजर करावी लागतात. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणामध्ये मी माझ्या वरिष्ठ कार्यालयाला कळवून परवानगी मिळाल्याबाबतचा कोणताही कागद दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०१२ मध्ये बँकेत रुजू झालो असल्याने सन २०१२ पूर्वीच्या बँकेतील घडामोडी माझ्या समक्ष झालेल्या नाहीत.

**न्यायालयाची वेळ संपल्याने उर्वरित उलटतपास पुढील तारेखपर्यंत तहकूब.**

समक्ष

सही/–

दिनांक –१६.०१.२०२५.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आटपाडी.